नि. ५ वरील आदेश.

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे महाराष्ट्र को. ऑप. सोसायटीज ॲक्ट, १९६० चे कलम ९५(४) नुसार स्थगितीकरीता देण्यात आला आहे.

२. वादीने प्रस्तुतच्या अर्जात कथन केले आहे की, वादी हे प्रतिवादी क्र. १ बँकेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ बँक ही सहकार कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन झालेली सहकारी बँक आहे. वादी हे व्यवसायाने शिक्षक आहेत. प्रतिवादी क्र. २ हे महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले सहकार आयुक्त तथा निबंधक आहेत. महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांवर प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे नियंत्रण असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कायद्यातील तरतुदींना अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या अगर रिझर्व बँक ऑफ इंडियाचे नियम व आदेशाप्रमाणे निर्णयांची अंमलबजावणी केली जाते. त्या निर्णयांची अंमलबजावणी प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्यामार्फत केली जाते. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दाव्याचे कामी सामील केले आहे.

Seal of the Judge Co-operative Court SANGLI

३. वादी सन २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी बँकेच्या संचालक मंडळावर निवडून आलेले संचालक आहेत. वादी यांचे संचालक म्हणून असलेले पद सन २०२७ पर्यंत अस्तित्वात होते व आहे. वादीला संचालक पदावरुन काढण्याचा प्रतिवादी क्र. १ बँकेच्या संचालक मंडळास सहकार कायद्यातील तरतुदीनुसार कोणतीही कायदेशीर हक्क नाही. तथापि प्रतिवादी क्र. १ बँकेच्या संचालक मंडळावर काही संचालकांच्या दरम्यान वादी आणि अन्य संचालकांतही मतभेद झाल्यामुळे काही संचालक सहकार कायद्यातील तरतुदींच्या विरुध्द जाऊन प्रतिवादी क्र. १ बँकेचा कारभार बेकायदेशीररित्या व अनाधिकाराने करत आहेत. यामुळे संचालक मंडळाची सभा कोरम नसताना बेकायदेशीरपणे घेणे, बेकायदेशीर ठराव करुन कायद्यातील तरतुदींच्या विरुध्द जाऊन संचालकांना संचालक पदावरुन बेकायदेशीररित्या काढणे अशी कृत्ये प्रतिवादी क्र. १ बँकेचे संचालक करत आहेत. त्यामुळे वादी व अन्य संचालकांत काही संचालकांविरुध्द या मे न्यायालयात लवाद दावा क्र. ३५/२०२५ दाखल केला आहे. त्यामुळे सदर संचालक वादी व अन्य संचालकांवर मनात राग धरुन होते. त्याचाच एक भाग म्हणून प्रतिवादी क्र. १ बँकेचे श्री. श्रीकांत आप्पासो पवार आणि श्री. श्रीमंत

30/4/26

बसवंत पाटील या संचालकांचे संचालक पद बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने रद्द केले होते. त्यामुळे त्याही संचालकांनी प्रतिवादी क्र. १ बँकेविरुध्द लवाद दावा क्र. ८७/२०२६ दाखल केला आहे.

४. दावा क्र. ३५/२०२६ चे कामी मे. न्यायालयाने वादीचा नि. ५ चा अर्ज अंशत: मंजूर करुन प्रतिवादी क्र. १ बँकेच्या ठरावाची अंमलबजावणी करु नये, अशी ताकीद प्रतिवादी बँकेस दिली आहे. त्यामुळे दावा क्र. ३५/२०२६ मधील प्रतिवादी संचालक वादी वर राग धरुन आहेत. सदर दाव्यातील प्रतिवादी संचालकांनी एकमेकांशी संगनमत करुन वादीच्या विरुध्द कट-कारस्थान करुन अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे सहकार कायद्यातील तरतुदींविरुध्द जाऊन दि. १३/०१/२०२६ रोजी पत्र पाठवुन वादीस खुलासा मागितला होता. त्यास वादीने दि. १८/०१/२०२६ रोजीचे पत्र देऊन कागदपत्रांची मागणी केली होती. प्रतिवादी क्र. १ बँकेने वादीस जाणुन-बुजून कोणतीही कागदपत्रे दिली नाहीत. असे असताना प्रतिवादी क्र. १ बँकेने अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे दि. १४/०२/२०२६ रोजीचे संचालक मंडळ मिटींगची कोणतीही नोटीस वादीस बजावली नव्हती. तसेच दि. २८/०३/२०२६ रोजीच्या संचालक मंडळ मिटींगची नोटीस वादीस दिलेली नाही. त्याबाबत वादीने दि. ०१/०४/२०२६ रोजी प्रतिवादी यांच्याकडे खुलासा मागितला होता. तसेच प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडे तक्रारी अर्ज देऊन प्रतिवादी क्र. २ यांना तशी प्रत पाठविली आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी अर्ज करुन कोणताही खुलासा केला नाही अगर प्रतिवादी क्र. १ यांच्याकडे कोणताही खुलासा मागितलेला नाही.

५. प्रतिवादीने वादीच्या तक्रारी अर्जाची दखल न घेता प्रतिवादी क्र. १ बँकेने वादीला दि. १८/०३/२०२६ रोजीचे जा. क्र. २६०/२०१५ क्रमांकाची बेकायदेशीर रद्दबातल तथाकथित पत्र देऊन प्रतिवादी क्र. १ बँकेची दि. १४/०२/२०२६ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये ठराव क्र. १६(१) अन्वये वादीचे संचालक पद रद्द केल्याचे कळविण्यात आले आहे. दि. १८/०३/२०२६ रोजीचे पत्र दि. ०५/०४/२०२६ रोजी उशिरा दिले होते. सदर रद्दबातल, बेकायदेशीर पत्र वाचून वादीस मोठा मानसिक धक्का बसला. त्यामुळे प्रतिवादी बँकेकडे तातडीने दि. १४/०२/२०२६ रोजीचे संचालक मंडळ मिटींगची नोटीस

30/4/26

प्रत व ठरावाची प्रत मागणी केली होती.

६. सदर कागदपत्रांची झेरॉक्स वादीने दि. ०८/०४/२०२६ रोजी दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ बँकेच्या बेकायदेशीर कृत्यांची वादींना प्रथम माहिती झाली. दि. १४/०२/२०२६ रोजीचा ठराव क्र. १६(१) व त्या बेकायदेशीर ठरावाची प्रतिवादी क्र. १ बँकेने वादीने पाठविलेले दि. १८/०३/२०२६ रोजीचे पत्र हे दोन्ही कागद रद्दबातल, बेकायदेशीर, सहकार कायद्यातील तरतुदींच्या विरुध्द आहे. सदर अहवाल महाराष्ट्र शासनाचे सचिव राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे दि. २६/०१/२०२६ रोजीच्या आदेशाचा जाणीवपुर्वक विसर पडला आहे. तसेच दि. ०९/०३/२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे जे निर्देश मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी प्रतिवादी क्र. २ यांना दिले आहेत त्याचाही प्रतिवादी क्र. १ बँकेस विसर पडला आहे.

७. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र. १ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामते वादी हे संचालक म्हणून काम करण्यास अपात्र आहेत असे मत झाल्यास त्यांनी त्याबाबत सबळ कायदेशीर कारणांसहित प्रतिवादी क्र. २ यांना पाठविणे बंधनकारक होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांना सदर संचालकांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन त्याबाबत निर्णय घेण्याचा आहे. सदर नियमांची अधिकृतपणे अंमलबजावणी न करता दि. १४/०२/२०२६ रोजीचा बेकायदेशीर ठराव वादीला लागू होत नाही.

८. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील दुरुस्ती वादीस लागू होत नाही. कारण सदर दुरुस्ती ही राज्यातील सहकारी बँकांच्या निवडणूक प्रक्रिया राबवित असताना त्या दुरुस्तीच्या आधारे जे संचालक १० वर्षांपेक्षा जास्त संचालक म्हणून कार्यरत आहेत ते संचालक भविष्यात येणा-या निवडणूकीस पात्र राहणार नाहीत. त्या अनुषंगाने वादीची २०२७ पर्यंत संचालक म्हणून नेमणूक झाली असल्याने ती दुरुस्ती वादीस लागू होत नाही.

९. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ बँकेने दि. १४/०२/२०२६ रोजीच्या मिटींगमध्ये जो ठराव क्र. १६(१) व त्या ठरावाच्या आधारे वादीने पाठविलेले दि. १८/०३/२०२६ रोजीचे पत्र असे दोन्ही दस्तऐवज बेकायदेशीर रद्दबातल आहेत

30/6/26

असे जाहीर होऊन मिळावे व तसेच दि. १४/०२/२०२६ रोजीच्या ठरावाची अंमलबजावणी प्रतिवादी क्र. १ यांनी स्वत: अगर इतरांमार्फत करु नये अशी निरंतर हुकूमी मनाई ताकीद प्रतिवादी क्र. १ यांना होण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र. १ बँकेने वादींना पाठविलेले जा. क्र. २६०/१५ क्रमांकाचे दि. १८/०३/२०२६ रोजीचे पत्र बेकायदेशीर व रद्दबातल आहे व ते वादीच्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होऊन मिळण्यासाठी आणि बँकिंग नियमन कायदा १९४९ चे कलम १० A (२ A) (I) चे दुरुस्तीबाबत प्रतिवादी क्र. २ यांना महाराष्ट्र शासनाचे काय धोरण आहे याबाबत लेखी खुलासा प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी करावा अशी निरंतर हुकूमी मनाई ताकीद होणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस बराच कालावधी लागणार आहे. सदर बेकायदेशीरपणे संचालक पद रद्द केल्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे विद्यमान संचालक या नात्याने वादी यास वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे वादींच्यावर मोठा अन्याय होतो. वादीचे न भरुन येणारे नुकसान होत आहे. बॅलेन्स ऑफ कन्वीनियन्स हार्डशिपचा विचार करता वादीच्या वतीने आहे. त्यामुळे बेकायदेशीर ठराव व पत्र स्थगित होणे आवश्यक आहे व जरुरीचे आहे. तसे न झाल्यास वादीचा दावा निष्फळ होणार आहे. सबब, वादीचा अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ यांनी नि. १३ वर तुर्तातुर्त अर्जास म्हणणे दाखल करुन सदर अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. प्रतिवादींनी कथन केले आहे की, दि. १४/०२/२०२६ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी जो ठराव क्र. १६(१) पारित केला आहे तो बँकिंग नियमन कायदा १९४९ (सुधारित) आणि कलम १०(A) (२ A) (I) मधील असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून झालेल्या तपासणी अहवालावरुन शे-यास अनुसरुन, सहकार आयुक्तांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन दाखल केला असुन मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्याचा संदर्भ घेऊन वादी यांचे संचालक पद रद्द करण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तुत दावा कलम ९१ प्रमाणे चालणेस पात्र नाही. तसेच महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त, रिझर्व बँक ऑफ इंडिया यांना पक्षकार केल्याशिवाय वादींना दाव्यातील मागणी मिळू शकत नाही.

30/4/26

११. वादी हे सन २०२२-२०२७ या कालावधीसाठी निवडून आलेले संचालक आहेत. परंतु सन २०२७ पर्यंत संचालक म्हणून त्यांचे पद अस्तित्वात आहे, हे कथन योग्य नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ बँकेचा मनमानी कारभार, काही संचालकांच्या दरम्यान झालेले मतभेद, बेकायदेशीर ठराव, कोरम याबाबत केलेली कथने चुकीची असुन त्यास आधार नाही. तसेच लवाद दावा क्र. ३५/२०२६ चा संदर्भ देऊन केलेली कथने चुकीची आहेत. दि. १३/०१/२०२६ रोजी प्रतिवादी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वादीने बँकिंग नियमन कायदा ४९(सुधारित) च्या कलम १० A नुसार खुलासा व उत्तर देणेबाबत पत्र दिले नाही. या पत्रास खुलासा न देता वादी यांनी दि. १८/०१/२०२६ रोजी काही कागदपत्रांची मागणी करुन कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर म्हणणे देण्यास मुदत मागितली होती. त्याप्रमाणे प्रतिवादी बँकेने दि. २१/०१/२०२६ रोजी वादीचा खुलासा कळविला होता व ४ दिवसात वादींनी आपले म्हणणे / खुलासा द्यावा असे कळविले होते. सदर पत्र वादीने रजिस्टर्ड पोस्टाने पाठवूनही वादी यांनी सदरचे पत्र स्विकारले नाही व त्यानंतर खुलासा दिलेला नाही. वास्तविक वादीस खुलासा देण्यासाठी कोणत्याच कागदपत्रांची आवश्यकता नव्हती. तरीही वादीने जाणीवपुर्वक खुलासा न दिल्याने वादी विरुध्द ठराव करुन पुढील कार्यवाही केली आहे.

१२. दि. १४/०२/२०२६ रोजीची कोणतीच नोटीस वादीस मिळाली नाही, हे कथन चुकीचे आहे. कारण त्या सभेस वादी हजर होते. वादीसह अन्य काही संचालकांनी ठरावास विरोध केल्याने ठराव क्र. १६(१) बहुमताने मंजुर करण्यात आला आहे. सदर सभेत वादीचे संचालक पद रद्द केल्यानंतर प्रतिवादी बँकेने रितसर कळविले होते. वादीचे संचालक पद रद्द झाल्यानंतर त्या पुढील मिटींगची त्यांना नोटीस देण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे दि. २८/०३/२०२६ रोजीच्या मिटींगची नोटीस वादीला दिली नव्हती.

१३. वादीने दावा कलम ४ मध्ये कथन केले आहे की, पत्र मिळाल्यानंतर धक्का बसला हे योग्य नाही कारण दि. १४/०२/२०२६ रोजी वादी सभेस हजर असल्यास प्रोसिडिंग प्रतिवादी क्र. १ संस्थेकडे आहे व त्याची प्रत दाखल केली आहे. वादी अपात्र असताना संचालक म्हणून पुढे काम पाहता येणार

30/4/26

नाही. वादी हे १६ वर्षाहुन अधिक कालावधीसाठी प्रतिवादी बँकेचे संचालक मंडळ सदस्य आहेत ही वस्तुस्थिती वादींनी नाकारलेली नाही. त्यामुळे वादी अपात्रता धारण करत असल्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस नाही. अपात्रता धारण करणा-या संचालकांचे पद रद्द केले म्हणून त्यांना स्थगिती आदेश मागता येणार नाही. तसेच सदर कारणाने इरिपेरेबल लॉस होण्याचे कोणतेही कारण नाही. वादीचा कोणताही कायदेशीर हक्क हरविला जात नाही. न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. वादीचा स्थगिती अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

१४. सदरचा अर्ज निर्णित करण्यासाठी उपस्थित झालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष आणि त्यामागील कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे :-

अ. क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१	प्रथमदर्शनी प्रकरण वादीच्या बाजुने आहे काय?	नाही
२	न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय?	नाही
३	तात्पुरता मनाई आदेश नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते काय?	नाही
४	काय आदेश?	अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

<u>युक्तीवाद</u>

१५. वादीतर्फे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, वादी हे प्रतिवादी क्र. १ चे सभासद असल्याबाबत प्रतिवादींनी नाकारलेले नाही. वादी यांची संचालक म्हणून सन २०२२ ते सन २०२७ या कालावधीकरीता निवड झाली. अशाप्रकारे प्रतिवादी क्र. १ बँकेच्या काही संचालकांनी बेकायदेशीर ठराव, कृत्ये केल्यामुळे काही संचालकांनी कोर्टात दावा दाखल केला. त्याचा राग मनात धरुन बेकायदेशीररित्या बँकेने नियमांचा दुरुपयोग करुन वादीचे संचालक पद बेकायदेशीररित्या रद्द केले आहे. महाराष्ट्र सहकारी कायदा कलम ७३(A)(1)(iv) व नियम ५८ नुसार वादीचा प्रस्तुतचा बेकायदेशीर ठराव पारित करण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच महाराष्ट्र बँकिंग नियमन मधील वादी आव्हानीत करत नसल्याने महाराष्ट्र शासन आवश्यक पक्षकार नाही. वादीस प्रथमदर्शनी केस

30/4/26

आहे. तसेच न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असुन सदर अर्ज मंजुर न केल्यास वादीस कधीही न भरुन येणार नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

१६. वादीच्या विद्वान वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रस्तुत अर्जातील मागणी ही केवळ प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द असल्याने प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे म्हणणे येईपर्यंत सदर अर्ज निर्णित करण्यास थांबण्याची आवश्यकता नाही.

१७. प्रतिवादी क्र. १ यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी हे १० वर्षापेक्षा अधिक काळ प्रतिवादी क्र. १ बँकेचे संचालक असल्याची बाब मान्य आहे. तसेच १० वर्षावरील अधिक काळ संचालक असणा-या व्यक्तीस अपात्रता येते ही बाब वादीस मान्य आहे. वादी हे प्रतिवादी क्र. १ यांच्याकरीता निवडून आलेले संचालक नसुन तज्ञ संचालक म्हणून निवड झालेले आहेत. प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला नाही. दि. १४/०२/२०२६ रोजीचा ठराव बारकाईने वाचला असता बँकिंग नियमन, सहकार आयुक्त यांच्या आदेशाने आणि मा. उच्च न्यायालय यांच्या निर्देशाप्रमाणे पारित करण्यात आला आहे. रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या आलेल्या अहवालावेळी वादी हे प्रतिवादी क्र. १ चे चेअरमन होते. वादीस दाद मागण्याचा कोणताही अधिकार नाही. कारण ते नियमानुसार अपात्र आहेत. तसेच सदर बँकिंग नियमन, रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचा अहवाल, सहकार आयुक्त आणि मा. उच्च न्यायालय यांचे निर्देश बारकाईने पाहिले असता १० वर्षावरील अधिक कालावधीसाठी असणा-या संचालकांची अपात्रता केवळ निवडणुकीच्या वेळी येत नसुन विद्यमान संचालकांस पुढे लागू होते.

१८. प्रतिवादी क्र. १ च्या विद्वान वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रस्तुत दावा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रात येत नाही. कारण आरबीआय, महाराष्ट्र शासन यांना आवश्यक पक्षकार म्हणून वादींनी दाव्यात सामील केलेले नाही. वादी यांनी दि. १४/०२/२०२६ रोजीच्या ठरावास हजर असल्याची बाब लपविली आहे. वादीला सदर ठराव पारित होण्यापुर्वी त्याची बाजू मांडण्याची

30/4/26

पुरेपुर संधीही मिळाली आहे. वादीचे म्हणणे आहे की, दि.२८/०३/२०२६ चा ठराव कळविला गेला नाही. मात्र त्या पुढील मिटींगचे पत्र देण्याचे कारण झाले नाही. कारण वादीचे संचालक पद रद्द झाले आहे. वादीची अपात्रता असल्यामुळे त्यास कोणतेही नुकसान होत नाही. या उलट प्रतिवादी क्र. १ कायद्याचे पालन करीत आहे. वादीस कायद्याप्रमाणे स्वयंचलित समाप्ती बँकिंग नियमांनुसार आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७३(A)(1)(iv) च्या नियम ५८ लागू होत नाही. सदर ठरावाची अंमलबजावणी झालेली आहे. त्यामुळे सदरच्या अर्जानुसार वादीस प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही. तसेच वादीला कोणतेही अधिकार नसल्यामुळे त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

१९. वादीतर्फे नि. ३ सोबत खालील कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत -

अ.क्र.	कागदपत्रे
१	महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३अअअ५अ अंतर्गत अधिसुचना
२	राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. २५७/२०२६ चे पत्र
३	मा. कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी प्रतिवादी क्र. २ यांना क्र. जीमस/१२२५/प्रक्र./२९३/२स चे पत्र
४	प्रतिवादी क्र. १ बँकेने वादींना दिलेले पत्र
५	वादींनी प्रतिवादी क्र. १ बँकेकडे दिलेले कागद मागणी पत्र
६	प्रतिवादी क्र. १ बँकेच्या दि. १४/०२/२०२६ रोजीच्या संचालक मंडळ मिटींगची नोटीस
७	प्रतिवादी क्र. १ बँकेच्या संचालक मंडळ मिटींग दि. १४/०२/२०२६ रोजीच्या ठराव क्र. १६(१) ची प्रत
८	वादींनी प्रतिवादी क्र. १ यांना दिलेला अर्ज
९	वादींनी प्रतिवादी क्र. ३ यांना दिलेला अर्ज
१०	प्रतिवादी क्र. १ बँकेने वादींना दिलेले जा. क्र. २६०/१५ क्रमांकाचे पत्र
११	वादीचे संचालक पद रद्द केल्याबाबतची बातमी पुण्यनगरी या वर्तमान

30/4/26

	पत्रामध्ये प्रसिध्द झाली तो अंक
१२	सहकार वाद क्र. ३५/२०२६ चे कामातील नि. १ ची प्रत
१३	सहकारी वाद क्र. ३५/२०२६ मधील ९५(४) चा अर्ज व त्यावरील आदेश
१४	सहकारी वाद क्र. ८७/२०२६ चे कामातील नि. १ ची प्रत
१५	प्रतिवादी क्र. १ बँकेस दावा दाखल करणेपुर्वीची समज दिलेची पोहोच

२०. प्रतिवादीतर्फे नि. १४ सोबत खालील कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत -

अ. क्र.	कागदपत्रे
१	प्रतिवादी क्र.१ ने वादी सह सर्व संचालकांना दि.१४/०२/२०२६ च्या संचालक मंडळ सभेची नोटीस पाठविलेबाबतची जावक नोंद रजिस्टर ची लागुपुरती नक्कल
२	संचलाक मंडळ सभा दि.१४/०२/२०२६ चे संचालकांच्या मिटींगला हजर असलेबाबतच्या रजिस्टरची लागुपुरती नक्कल
३	वादी यांना त्यांच्या दि.१८/०१/२०२६ च्या अर्जास प्रतिवादी क्र.१ बँकेने पाठविलेले उत्तर
४	सदरचे पत्र वादीने न घेतलेमुळे ते परत आले बाबतचे रजिस्टर पोस्टाचे पाकीट
५	रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेले पत्र
६	महाराष्ट्र शासनाचे सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आलेले दि. ०९/०३/२०२६ रोजीचे पत्र
७	दि.१४/०२/२०२६ रोजी झालेला ठराव नं.१६/१ दि.२८/०३/२०२६ च्या संचालक मंडळ मिटींगमध्ये कायम झालेबाबतचा प्रतिवादी कडील संचालक मंडळ सभेची लागुपुरती नक्कल

२१. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.१५ वर ना.मा.उच्च न्यायालय यांचे ***Kolhapur District Urban Banks Co.op Association Ltd. and Ors VS Union of India & others*** हा न्यायनिवाडा दाखल केला आहे.

मुद्दा क्र. १ ते ३ करीता

30/4/26

२२. सदर अर्ज गुणदोषावर ठरविताना प्रथम प्रतिवादी क्र. १ यांनी नि. १५ सोबत खालील न्यायनिवाडा दाखल केला आहे, तो प्रथम विचारात घेणे आवश्यक आहे :-

KOLHAPUR DISTRICT URBAN BANKS CO.OP. ASSOCIATION AND ORS. Vs. UNION OF INDIA AND OTHERS.

WRIT PETITION NO. 12121 OF 2025

२३. The Hon'ble High Court held that, the Banking Laws (Amendment) Act,2025 prescribes that, in case of Co-operative Banks, if on or after that, date the amendment coming into force i.e. 1st August 2025 any such director, who has been in office continuously for a term of 10 years, he/she cannot hold office.

२४. उपरोक्त नमुद न्यायनिवाड्यातील न्यायतत्व विचारात घेतली.

२५. वादीचा नि. ५ अर्ज, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे, उभय पक्षांनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेतली. तसेच प्रतिवादींनी दाखल केलेला न्यायनिवाड्यातील न्यायतत्व विचारात घेतली. वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज विचारात घेताना वादीस प्रथमदर्शनी केस आहे का? न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? तसेच वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का? या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

२६. प्रस्तुत केसमध्ये प्रतिवादी क्र.१ बँकेच्या संचालक मंडळावर सन २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी वादी निवडून आलेला संचालक आहे, ही बाब मान्य आहे. तसेच, १० वर्ष कालावधीकरीता संचालक पदावर असणाऱ्या संचालकास संचालक पदावर राहता येणार नाही, ही बाब वादीस मान्य आहे.

२७. वादीच्या कथनानुसार लवाद दावा क्र.३५/२०२६ दाखल केल्याच्या राग व द्वेष असल्यामुळे प्रतिवादी क्र.१ बँकेच्या संचालकांनी वादी विरुध्द कट कारस्थान करुन वादीला संचालक पदावरुन काढून टाकण्याच्या दुष्ट

30/01/26

निर्धार करुन दि.१३/०१/२०२६ रोचीचे बेकायदेशीर पत्र पाठवून खुलासा मागितला. वादीने दि.१८/०१/२०२६ रोजीचे पत्र देवून कागदपत्रांची मागणी केली. मात्र, जाणुनबुजुन ती कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ बँकेने दिली नाहीत. असे असताना प्रतिवादी क्र.१ बँकेने बेकायदेशीर व अनाधिकाराने दि. १४/०२/२०२६ व दि.२८/०३/२०२६ रोजीच्या नोटीसा वादीला बजावल्या नाहीत. दि.१४/०२/२०२६ रोजीच्या मिटींगमध्ये बेकायदेशीर ठरावाने वादीचे संचालक पद रद्द केले. त्याबाबत दि.१८/०३/२०२६ रोजीचे पत्राने वादीस कळविले.

२८. याठिकाणी उभय पक्षाने दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेतली असता राज्य सहकार निवडणुक प्राधिकारण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.१६/०१/२०२६ रोजीचे पत्र बारकाईने वाचले असता बँकिग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ चे कलम १० A (2A)(i) मधील सुधारणे बाबत आदेश बँकिग कायदे(सुधारणा) अधिनीयम २०२५ दि.१५/०४/२०२५, भारताचे राजपत्र-असधारण (वित्त मंत्रालय) अधिसुचना दि.२९/०७/२०२५, मा. उच्च न्यायालय कलकत्ता येथील दाखल रिट याचिका क्र.२६८२२/२०२५ मधील आदेश दि.०५/१२/२०२५ मा. उच्च न्यायालय मुंबई, फिरते न्यायालय ,कोल्हापुर येथे दाखल रिट याचिका क्र. १२१२१/२०२५ मधील आदेश दि.१२/१२/२०२५ विचारात घेवून निर्गमित करण्यात आलेला आहे.

२९. वादीने नि.३/३ सोबत दाखल केलेल्या दि.०९/०३/२०२६ रोजीचे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिलेले पत्र वाचले असता त्यामध्ये नमुद करण्यात आले आहे की, ज्या संचालकांनी १० वर्षापेक्षा जास्त कालावधी संचालक म्हणून कार्यकाळ पुर्ण केला असेल, असे संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुढील निवडणुकीसाठी अपात्र असतील. तसेच, ज्या संचालकांनी १० वर्षाचा कार्यकाळ संचालक म्हणून पुर्ण केला असेल त्यानंतर त्यांनाही संचालक म्हणून अपात्र करण्यात यावे असे मत/धारण पक्की करण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेस शासनाच्या दि.१०/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन भारतीय रिझर्व बँकेने दि.१८/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये विभागाच्या मत/धारणेस सहमती दर्शविली आहे. सदर तरतुदीची तात्काळ

अंमलबजावणी करण्यासाठी कळविले आहे. यावरुन ज्या संचालकांनी १० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संचालक म्हणून कार्यकाळ पुर्ण केला, ते पुढील निवडणुक प्रक्रिया राबविताना तसेच संचालक असतानाही अपात्र ठरतात.

३०. अशा परिस्थीतीत वादीला मान्य आहे की, त्याने १० वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ पुर्ण केला आहे व तो सन २०२२ ते २०२७ च्या कालावधीकरीता निवडुन आलेला संचालक आहे. वर नमुद दि.०९/०३/२०२६ च्या पत्रानुसार वादी हा संचालक म्हणून अपात्र ठरत आहे, याबाबत वादीला नोटीस दि. १३/०१/२०२६ रोजीची प्रतिवादी क्र.१ बँकेने पाठवून खुलासा मागविला होता. वादीच्या कथनांनुसार त्यावर त्याने कागदपत्रांची मागणी करुन देखील प्रतिवादी क्र.१ याने त्याची पुर्तता केली नाही. या करीता प्रतिवादींनी नि.१४ सोबत दाखल कागदपत्रांवर प्रतिवादीचे कथन की, वादी यांनी १८/०१/२०२६ रोजी केलेल्या कागदपत्रांची मागणी नुसार म्हणणे देण्यास मुदत मागितली होती. त्याप्रमाणे वादीस दि.२१/०१/२०२६ रोजी त्याबाबतचा खुलासा प्रतिवादी क्र.१ यांनी कळविला होता. मात्र वादीने रजिस्टर पोस्टाने पाठविलेले पत्र स्विकारले नाही. तसेच, नि.१४ (२) वरील कागदपत्रांवरुन लक्षात येते की, दि.१४/०२/२०२६ रोजीच्या मिटींगला वादी हजर होता. सदर बाब वादीने युक्तीवादादरम्यान नाकारलेली नाही. तसेच, दि.१४/०२/२०२६ रोजीच्या ठराव क्र.१६(१) अन्वये वादीचे संचालक पद रदद केल्याचे कळविल्याची बाब मान्य केली आहे. मात्र सदर बाब दि.१८/०३/२०२६ च्या पत्राने तातडीने कळविले नाही असे म्हणणे याठिकाणी वर नमुद परिस्थीतीत वादी स्वता दि.१४/०२/२०२६ रोजी प्रतिवादी क्र.१ यांचे कडील संचालक सभेस हजर असताना ठरावाची माहिती दि.१८/०३/२०२६ च्या पत्राने दि.०५/०४/२०२६ रोजी कळाली याबाबत प्रश्न निर्माण होत आहे.

३१. वर नमुद कारणे व दाखल कागदपत्रांचा विचार केला असता दि.१४/०२/२०२६ रोजीचा ठराव क्र.१६(१) हा बेकायदेशीर असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच, वादीस म.स.का. कायदा कलम ७३ CA(1) (iv) आणि बँकीग नियमन कायदा १९४९ च्या कलम १०(A) नुसार अपात्रता येते. वादीच्या युक्तीवादानुसार म.स.का. नियम ५८ नुसार प्रतिवादी क्र.१ यास

30/5/26

संचालक पद रद्द करण्याचे अधिकार नाहीत. मात्र, म.स.का. कायदा कलम ७३ CA(2) नुसार अशी अपात्रता आल्यानंतर सदर पद ऑटोमॅटीक रिक्त होते. त्यामुळे, वादीचा युक्तीवाद याठिकाणी विचारात घेता येणार नाही.

३२. वादातील संचालक पद रद्द केल्याचा ठराव अंमलात आल्याची बाब वादीने नाकारलेली नाही. त्यामुळे, वरील कारणांचा विचार करता वादीस प्रथमदर्शनी केस दिसून येत नाही. सदर अर्ज मंजुर केल्यास वादीपेक्षा प्रतिवादी क्र.१ बँकेच्या कामकाज पध्दतीवर जास्त विपरीत परिणाम होणार आहे. तसेच, वादीपेक्षा प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मुददा क्र.१ ते ३ करीता नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ४ करीता

३३. मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष विचारात वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब, मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :-

आदेश

१. वादीचा अर्ज (नि. ५) नामंजूर करण्यात येतो.
२. अर्जाचा खर्च मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येईल.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Seal of the Judge, Co-operative Court, Sangli

30/4/2026

(श्रीमती एस. व्ही. जाधव)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय क्र. १, सांगली

स्थळ : सांगली.
दिनांक : ३०/०४/२०२६